नाशिक महानगरपालिका सेवेतील अभियांत्रिकी-तांत्रिक/अतांत्रिक व बिगारी संवर्गातील (वर्ग १ ते ४ ) अधिकारी/ कर्मचाऱ्यांची ०१ जानेवारी २०२५ रोजीची स्थिती दर्शविणारी संवर्गनिहाय प्रारूप जेष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

-: परिपत्रक :-

नाशिक महानगरपालिका, नाशिक

सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना शाखा)

जा.क्र.आस्था/वशि/कार्या-१५/७२ /२०२५ दिनांक :१८/०६/२०२५.

वाचा:- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, जून २२ आषाढ १, शके १९४३ दि. २१ जून २०२१.

---

महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियम, १९८२ मधील तरतूदीनुसार नाशिक महानगर पालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवाजेष्ठता सूची संवर्गनिहाय प्रसिध्द करण्यात येते. उपरोक्त संदर्भीय महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, जून २२, आषाढ १, शके १९४३ दिनांक २१ जून, २०२१ रोजीचे राजपत्रान्वये यापूर्वी दि. २१ जून १९८२ रोजी अधिसूचित केलेली महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली व या संदर्भात तदनंतर निर्गमित केलेले सर्व आदेश किंवा अभिलेख अधिक्रमित करुन महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ ही नियमावली दिनांक २१ जून, २०२१ रोजी अंमलात आलेली आहे.

उक्त नियमातील तरतूदीनुसार सामान्य प्रशासन विभागातील संबंधित सर्व कार्यासनाचे अखत्यारीतील गट-अ ते गट-ड मधील अधिकारी / कर्मचाऱ्यांची संवर्गनिहाय दिनांक ०१ जानेवारी, २०२५ रोजीची स्थिती दर्शविणारी संवर्गनिहाय प्रारुप जेष्ठता सुची प्रसिध्द करणेकामी अभियांत्रिकी - तांत्रिक/अतांत्रिक व बिगारी संवर्ग (वर्ग १ ते ४ ) एकुण २४ संवर्गाच्या सेवाजेष्ठता याद्या पुढील प्रमाणे तयार करण्यात आल्या आहे.

| अ.क्र. | संवर्ग | एकुण संवर्ग |
|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी - तांत्रिक/अतांत्रिक व बिगारी संवर्ग (वर्ग १ ते ४ ) | २४ |
| | एकुण संवर्ग | २४ |

उपरोक्त संवर्गाच्या प्रारुप सेवाजेष्ठता याद्या नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmc.gov.in यावर सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे माहितीसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या ज्या अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचे जेष्ठते बाबत किंवा इतर कर्मचा-यांचे जेष्ठतेबाबत काही आक्षेप असल्यास, त्याचप्रमाणे सेवाजेष्ठता यादीतील नमूद शैक्षणिक अर्हता, जातीचा संवर्ग, जन्म तारीख, सेवानिवृत्तीचा दिनांक इत्यादी बाबत काही हरकती / सुचना असल्यास सदर परिपत्रकाचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत सामान्य प्रशासन, पहिला मजला, मुख्यालय विभाग, राजीव गांधी भवन नाशिक महानगरपालिका येथे लेखी स्वरुपात सादर करण्यात याव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकती / सुचना किंवा आक्षेपांवर विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आयुक्त तथा प्रशासक सो }
यांचे मान्यतेने }

उप आयुक्त (प्रशासन)
नाशिक महानगरपालिका नाशिक

प्रत:

१) सर्व विभागप्रमुख / खातेप्रमुख / सर्व विभागीय अधिकारी
सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देऊन पोहोच स्वतंत्र नोंद वहीत घेण्यात यावी.

२) माहिती व तंत्रज्ञान विभाग सदरच्या प्रारुप सेवाजेष्ठता याद्या सॉफ्ट कॉपीमध्ये सहपत्रीत करण्यात येत असून सदर प्रारुप सेवाजेष्ठता याद्या नाशिक महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात याव्या.

REDMI 12 5G 19/06/2025